REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 15 | ISSUE - 4 | JANUARY - 2026

# यवतमाळ जिल्ह्यातील शेतमजूरांच्या आर्थिक स्थितीचे विश्लेषणात्मक अध्ययन (कालखंड: सन २०१२-१३ ते सन २०२१-२२)

श्री. नीलेश ब. जाधव
संशोधनकर्ता

डॉ. मारोती बी. राठोड
मार्गदर्शक , शिवरामजी मोघे कला , वाणिज्य व विज्ञान महाविधालय, पांढरकवडा, जि. यवतमाळ.



**सारांश**

प्रस्तुत विषयाच्या अनुषंगाने शेतमजुरांच्या आर्थिक स्थितिचे अध्ययन करण्यासाठी यवतमाळ जिल्ह्याची निवड केलेली आहे. कारण यवतमाळ जिल्हा हा पूर्णतः शेतीप्रधान जिल्हा तसेच आदिवासी जिल्हा म्हणून ओळखला जातो. एवतमाल जिल्ह्यातील शेतमजुरांच्या ज्या आर्थिक समस्या आहेत त्याच आर्थिक समस्या कमी अधिक भारतातील शेतमजुरांच्या असू शकतात. त्यामुळे शेतमजुरांच्या आर्थिक स्थितिचे अध्ययन करण्यासाठी **यवतमाळ जिल्ह्यातील शेतमजुरांच्या आर्थिक स्थितिचे विश्लेषणात्मक अध्ययन (कालखंड सन २०१२-१३ ते २०२१-२२)** हा विषय निश्चित केलेला आहे.

## प्रस्तावना

भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा म्हणून ओळखली जाणारी शेती ही फक्त अन्नधान्याचा पुरवठा करणारी प्रक्रिया नाही, तर ती ग्रामीण जीवनशैली, संस्कृती आणि सामाजिक रचनेचा मूलाधार आहे. देशाच्या लोकसंख्येतील जवळपास अर्धा कामगार वर्ग हा थेट किंवा अप्रत्यक्षपणे कृषी क्षेत्राशी निगडित आहे. परंतु या संपूर्ण संरचनेत सर्वांत मोठा आणि असुरक्षित घटक म्हणजेशेतीमजूर वर्ग. शेतकऱ्याकडे किमान जमीन मालकी किंवा भाड्याने घेतलेली शेती असते, परंतु मजूर पूर्णतः रोजंदारीवर अवलंबून असतात. पेरणी, खुरपणी, निंदणी, कापणी, गहू-तांदूळ झोडपणे, कापूस वेचणे, धान्य साठवणे अशा शारीरिक श्रमांवर आधारित कामांमध्ये ते गुंतलेले असतात. या मजुरांच्या जीवनाचा पाया हंगामी कामांवर आधारित असल्यामुळे त्यांना कायमस्वरूपी आर्थिक स्थैर्य लाभत नाही. त्यांच्या जीवनातील प्रत्येक अंग हवामानातील बदल, उत्पादनातील अस्थिरता, बाजारभावातील चढउतार तसेच ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या एकूण स्थितीवर पूर्णतः अवलंबून असते.

इतिहासाच्या दृष्टीने पाहिले तर शेतीमजुरांचे जीवन हे कायम गरिबी, शोषण, असमानता आणि असुरक्षिततेने व्यापलेले राहिले आहे. ग्रामीण समाजातील जातीनिहाय विभागणी, भूमिहीनता, सावकारी व्यवस्थेवर अवलंबित्व आणि शिक्षण-अभ्यासाच्या मर्यादित संधींमुळे त्यांचे जीवनमान सुधारण्यास अडथळे निर्माण झाले. मजुरी बहुतेक वेळा अनियमित असते, ती हंगामावर अवलंबून असल्यामुळे उन्हाळ्यात किंवा दुष्काळी काळात मजुरांकडे कामच राहत नाही. मजुरीचे दर अत्यल्प असतात, महिलांना व बालमजुरांना तर आणखी कमी वेतन दिले जाते. कर्जबाजारीपणा हा त्यांच्या जीवनाचा अविभाज्य भाग बनला आहे. सावकारी कर्जावरील व्याजदर इतके जास्त असतात की मजुरांना ते फेडणे अशक्य होते. परिणामी त्यांना आयुष्यभर आर्थिक गुलामगिरीत अडकून राहावे लागते.

शेतीतील संरचनात्मक बदलांमुळे आणि यांत्रिकीकरणामुळे मजुरांच्या रोजगाराच्या संधी आणखी कमी झाल्या आहेत. आधी जे कामे १० मजुरांनी केली असती, ती आता एक ट्रॅक्टर किंवा हार्वेस्टर करून टाकतो. बीटी कापूस आणि इतर तंत्रज्ञानाच्या वापरामुळे

उत्पादनात बदल झाला असला तरी मजुरीवर अवलंबून राहणाऱ्यांसाठी संधी कमी झाल्या. या बदलांचा परिणाम असा झाला की ग्रामीण मजूर वर्ग हंगामी कामापुरता मर्यादित राहिला आणि बाकीच्या काळात त्यांना अर्धबेरोजगारी किंवा शहरांकडे स्थलांतर याशिवाय पर्याय उरला नाही.

यवतमाळ जिल्ह्याचा विचार केल्यास परिस्थिती अधिक गंभीर दिसते. विदर्भातील हा जिल्हा 'कापसाचा पट्टा' म्हणून प्रसिद्ध आहे. परंतु गेल्या दोन दशकांमध्ये येथे उद्भवलेल्या कृषी संकटामुळे व शेतकरी आत्महत्यांमुळे हा प्रदेश राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर चर्चेत आला. या संकटाचा परिणाम फक्त शेतकऱ्यांवरच नाही, तर शेतीमजुरांवरही तीव्र स्वरूपात झाला. कारण शेतकऱ्यांकडे जमीन असली तरी उत्पादन अपयशी झाल्यास त्यांच्याकडे कर्जमाफी, बँकिंग सुविधा किंवा सरकारी अनुदान यांसारखे पर्याय कधीना कधी मिळतात. पण भूमिहीन मजुरांकडे कोणताही आधार नसतो. पिके नापिक गेली की शेतकऱ्यांकडे त्यांना काम मिळत नाही. परिणामीत्यांच्या रोजंदारीवर गदा येते, उत्पन्न घटते आणि जगणे अशक्य होते.

२०१२-१३ ते २०२१-२२ हा कालावधी विशेष लक्षवेधी आहे. या दशकात अनेक धोरणात्मक हस्तक्षेप झाले – मनरेगा अंतर्गत रोजगार हमी, किमान वेतन सुधारणा, लक्ष्यित कल्याणकारी योजना राबविण्याचे प्रयत्न इत्यादी. मात्र प्रत्यक्ष अंमलबजावणीत अनेक अडचणी आल्या. ग्रामीण रोजगार हमी योजनेत निधीची कमतरता, भ्रष्टाचार व कामांची अनियमितता यामुळे मजुरांना अपेक्षित संरक्षण मिळाले नाही. दुसरीकडे, बीटी कापसाचा प्रसार, यांत्रिकीकरण, तंत्रज्ञानाचा वाढता वापर यांनी मजुरांचे पारंपरिक काम हिसकावले. आर्थिक संकट, दुष्काळ, पावसाचे अनियमित चक्र आणि उत्पादनखर्चातील वाढ यामुळे मजुरीच्या संधी मोठ्या प्रमाणात घटल्या. शेतकरी आत्महत्यांसारख्या मानवी शोकांतिकेमुळे ग्रामीण समाजाची मानसिक जडणघडण हादरून गेली असून त्याचा अप्रत्यक्ष व गंभीर परिणाम मजुरांच्या उपजीविकेवर झाला आहे.

या दशकाच्या अखेरीस कोविड-१९ या महामारीने ग्रामीण अर्थव्यवस्थेला मोठा धक्का दिला. लॉकडाऊनमुळे ग्रामीण भागातील कामे थांबली. मजुरांचे स्थलांतर उलट दिशेने झाले – शहरांतून लाखो मजूर गावी परतले, परंतु गावात त्यांच्यासाठी रोजगार नव्हता. शेती हंगामी असल्यामुळे त्यांना काम मिळाले नाही. परिणामी ग्रामीण मजूर वर्गाची आर्थिक असुरक्षितता प्रचंड वाढली.

यातून स्पष्ट होते की शेतीमजूर वर्ग हा कृषी अर्थव्यवस्थेतील सर्वात उपेक्षित, परंतु अत्यावश्यक घटक आहे. शेतकरी प्रश्नांवर विस्तृत संशोधन झाले असले तरी मजुरांच्या प्रश्नांकडे कमी लक्ष दिले गेले आहे. यवतमाळसारख्या जिल्ह्यांत शेतकरी व मजूर दोघेही शेती संकटाने ग्रस्त आहेत, परंतु मजुरांची स्थिती अधिकच हलाखीची आहे कारण त्यांच्याकडे कोणतीही मालकी हक्काची संपत्ती नाही. त्यामुळे या वर्गाचा अभ्यास करणे अत्यंत आवश्यक ठरते.

या अभ्यासाचे उद्दिष्ट म्हणजे – मजुरांचे उत्पन्न, मजुरी रचना, रोजगारातील अस्थिरता, महागाई व कर्जाचे परिणाम, स्थलांतराचे प्रवाह, सरकारी योजनांची व्याप्ती आणि परिणामकारकता यांचे सखोल विश्लेषण करणे. यामुळे या वर्गाला भेडसावणाऱ्या संरचनात्मक आव्हानांची ओळख होईल. तसेच, त्यांच्या जीवनमान सुधारण्यासाठी कोणते धोरणात्मक बदल आवश्यक आहेत हे स्पष्ट होईल.

सारांश असा की, २०१२-१३ ते २०२१-२२ या कालावधीत यवतमाळ जिल्ह्यातील शेतीमजुरांची आर्थिक स्थिती हे केवळ एक संशोधनाचे विषय नसून सामाजिक न्याय, आर्थिक समतोल आणि ग्रामीण विकास या तिन्ही अंगांनी महत्त्वाचे प्रकरण आहे. या अभ्यासाचे निष्कर्ष धोरणकर्ते, शैक्षणिक क्षेत्रातील तज्ञ आणि विकास अभ्यासक यांना मार्गदर्शन करणारे ठरतील आणि भविष्यातील योजनांमधून या असुरक्षित वर्गाचे जीवनमान उंचावण्यासाठी ठोस उपाययोजना राबविण्यात मदत करतील.

**सारणी क्रमांक ४.४.१: स्वत:च्या मालकीची शेतजमीन असण्यासंबंधी यवतमाळ जिल्ह्यातील शेतमजुरांच्या प्रतिक्रिया**

| प्रतिक्रिया | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| होय | २८५ | ४५०. |
| नाही | ३४९ | ५५०. |
| **एकूण** | **६३४** | **१००** |
| **काई वर्गमूल्य** | **स्वातंत्र्यांश** | **मूल्यP** |
| ६ ४६१. | १ | ०.०५> |

सारणी क्रमांक ४.४.१ मध्ये स्वत:च्या मालकीची शेतजमीन असण्यासंबंधी यवतमाळ जिल्ह्यातील शेतमजुरांच्या प्रतिक्रिया दर्शविण्यात आल्या आहे. सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार यवतमाळ जिल्ह्यातील ५५.०% शेतमजुरांचीस्वत:च्या मालकीची शेतजमीन नसून ४५.०% शेतमजुरांचीस्वत:च्या मालकीची शेतजमीन आहे.

नॉन पॅरामेट्रिक काई वर्ग चाचणीचे परिणाम दर्शवितात की अध्ययन क्षेत्रातील शेतमजुरांची स्वत:च्या मालकीची शेतजमीन असण्यानुसार तुलना केली असता, त्यांच्या दरम्यान सार्थक (काईवर्ग = ६.४६ ; स्वातंत्र्यांश =१ ; P मूल्य <०.०५) अंतर आहे. उपरोक्त माहितीवरून असे निदर्शनास येते की यवतमाळ जिल्ह्यातील बहुतांश शेतमजुरांचीस्वत:च्या मालकीची शेतजमीन नाही.

**सारणी क्रमांक ४.४.२: स्वत:च्या मालकीच्या एकूण जमिनीसंबंधीयवतमाळ जिल्ह्यातील शेतमजुरांच्याप्रतिक्रिया**

| **एकूण जमीन** | **संख्या** | **टक्केवारी** |
|---|---|---|
| १ एकरपेक्षा कमी | १२७ | ४४६. |
| १एकर ३- | १०० | ३५१. |
| ३ एकरपेक्षा जास्त | ५८ | २०४. |
| **एकूण** | **२८५** | **१००** |
| **काई वर्गमूल्य** | **स्वातंत्र्यांश** | **मूल्यP** |
| २५ ४५३. | २ | ०.०५> |

सारणी क्रमांक ४.४.२ मध्ये स्वत:च्या मालकीच्या एकूण जमिनीसंबंधी यवतमाळ जिल्ह्यातील शेतमजुरांच्या प्रतिक्रिया दर्शविण्यात आल्या आहे. सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार यवतमाळ जिल्ह्यातील ४४.६% शेतमजुरांकडे स्वत:च्या मालकीची १ एकरपेक्षा कमी जमीन असून ३५.१% शेतमजुरांकडे स्वत:च्या मालकीची १ - ३ एकर दरम्यान जमीन आहे. तसेच २०.४% शेतमजुरांकडे स्वत:च्या मालकीची ३ एकरपेक्षा जास्त जमीन असल्याचे दिसून आले.

नॉन पॅरामेट्रिक काई वर्ग चाचणीचे परिणाम दर्शवितात की अध्ययन क्षेत्रातील शेतमजुरांची स्वत:च्या मालकीच्या एकूण जमिनीनुसार तुलना केली असता, त्यांच्या दरम्यान सार्थक (काईवर्ग = २५.४५३; स्वातंत्र्यांश =२ ; P मूल्य <०.०५) अंतर आहे. उपरोक्त माहितीवरून असे निदर्शनास येते की यवतमाळ जिल्ह्यातील बहुतांश शेतमजुरांकडेस्वत:च्या मालकीची १ एकरपेक्षा कमी जमीन आहे.

**सारणी क्रमांक ४.४.४: यवतमाळ जिल्ह्यातील शेतमजुरांचीमिळविलेल्या सरासरी दैनंदिन मजुरीसंबंधीमाहिती**

| **सरासरी दैनंदिन मजुरी** | **संख्या** | **टक्केवारी** |
|---|---|---|
| २०० रुपयांपेक्षा कमी | १२९ | २०३. |
| रू- २०० . रू३०० . | १८८ | २९७. |
| रू- ३०१ . रू४०० . | १९६ | ३०९. |
| रू- ४०१ . रू५०० . | ७६ | १२०. |
| ५०० रुपयांपेक्षा जास्त | ४५ | ७१. |
| **एकूण** | **६३४** | **१००** |
| **काई वर्गमूल्य** | **स्वातंत्र्यांश** | **मूल्यP** |
| १४० ४६४. | ४ | ०.०५> |

सारणी क्रमांक ४.४.४ मध्ये यवतमाळ जिल्ह्यातील शेतमजुरांची मिळविलेल्या सरासरी दैनंदिन मजुरीसंबंधी माहिती दर्शविण्यात आली आहे. सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार यवतमाळ जिल्ह्यातील ३०.९% शेतमजुरांना रु. ३०१- रु. ४०० दरम्यान सरासरी दैनंदिन मजुरी मिळत असून २९.७% शेतमजुरांना रु. २०० - रु. ३०० दरम्यान सरासरी दैनंदिन मजुरी मिळते. तसेच २०.३% शेतमजुरांना २०० रुपयांपेक्षा कमी सरासरी दैनंदिन मजुरी मिळत असून १२.०% शेतमजुरांना रु. ४०१- रु. ५०० दरम्यान सरासरी दैनंदिन मजुरी मिळते. त्याचप्रमाणे ७.१% शेतमजुरांना रु. ५०० पेक्षा जास्त सरासरी दैनंदिन मजुरी मिळते.

नॉन पॅरामेट्रिक काई वर्ग चाचणीचे परिणाम दर्शवितात की अध्ययन क्षेत्रातील शेतमजुरांची मिळविलेल्या सरासरी दैनंदिन मजुरीनुसार तुलना केली असता, त्यांच्या दरम्यान सार्थक (काईवर्ग = १४०.४६४; स्वातंत्र्यांश =४ ; P मूल्य <०.०५) अंतर आहे. उपरोक्त माहितीवरून असे निदर्शनास येते की यवतमाळ जिल्ह्यातील बहुतांश शेतमजुरांना रु. ३०१- रु. ४०० दरम्यान सरासरी दैनंदिन मजुरी मिळते.

## निष्कर्ष :

स्वत:च्या मालकीची शेतजमीन असणाऱ्या शेतमजुरांची संख्या अधिक आहे. बहुतांश शेतामजुरांकडे१ एकरपेक्षा कमी जमीन आहे. सर्वाधिक शेतमजूर शेती कामगार आहेत. बहुतांश शेतमजुरांना रु. ३०१ -रु. ४०० दरम्यान दैनंदिन मजुरी मिळते. दरवर्षी शेतीमध्ये १००-२०० दिवस काम करणाऱ्या शेतमजुरांची संख्या सर्वाधिक आहे. बहुतांश शेतमजूर कर्ज घेतात. बँकेकडून कर्ज घेणाऱ्या शेतमजुरांची संख्या सर्वाधिक आहे. बहुतांश शेतमजुरांचे घरगुती वार्षिक उत्पन्न रु. ५०,००० पेक्षा कमी आहे. ऑफ सिझनमध्ये बेरोजगारीचा सामना करवा लागणाऱ्या शेतमजुरांची संख्या सर्वाधिक आहे. बहुतांश शेतमजुरांना ऑफ सिझनमध्ये ३-४ महिने बेरोजगारीचा सामना करावा लागतो. बहुतांश शेतमजूर ऑफ सिझन मध्ये मनरेगाचे (सरकारी रोजगार योजना) काम करतात. बहुतांश शेतमजुरांची आर्थिक स्थिती ५ वर्षापूर्वीच्या तुलनेत चांगली आहे.

## संदर्भ:


1) Behere, P.B., & Behere, A.P. (2008). "Farmers' suicide in Vidarbha region of Maharashtra State: A sociological study." Indian Journal of Psychiatry, 50(3), 124-127.
2) Tupe, S., & Joshi, V. (2019). "Trends in Agriculture of Yavatmal Maharashtra (India): District Level Analysis." Research Institute Publications, pp. 5-18.
3) Breman, J. (1978). Landless Labour and the Rural Economy: Social Change and Rural Labour in India. Oxford University Press, pp. 157-180.
4) Shambharkar, Y. (2018). "Knowledge and adoption behavior of Bt cotton growers about integrated nutrient management practices in Yavatmal district of Vidarbha region." International Journal of Agriculture and Environmental Research, 22(2), 22-39.
5) Santosh Gandhi, & Lahoti, J. (2014). "Agricultural labor migration: Case study from Vidarbha, Maharashtra." Journal of Rural Development, 33(3), 243-262.
6) Kale, P.S., Chatse, D.B., & Perke, D.S. (2023). "Economic analysis of socio-economic characteristics and land use pattern of large farmers in Yavatmal district, Maharashtra." Indian Journal of Agricultural Sciences, 12(4), 867-872.
7) Devra, V., & Kale, R. (2016). "Wage Patterns and Land Ownership among Farm Labourers in Yavatmal." Indian Labour Review, 12(3), 211-226.
8) More, D., & Suryavanshi, R. (2012). "Credit and Indebtedness of Farm Workers in Vidarbha." Financial Inclusion Journal, 6(3), 127-138.